# नवजात वासराचे संगोपन

**डॉ. श्याम देशमुख**

पशुजनन, मादीरोग व प्रसुतीशास्त्र विभाग
स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशु विज्ञान संस्था, अकोला.

नवजात वासरांचे संगोपन हे दुग्ध व्यवसायातील महत्वाचे अंग असुन सशक्त वासरापासुन निरोगी व उत्तम प्रतीच्या गाई निर्माण होतात. सशक्त व निरोगी वासरांचे योग्य संगोपन केल्यास त्यांचा वजन वृध्दी दर चांगला राहतो व योग्य वेळेत प्रजननक्षम बनतात व लवकर उत्पादन देण्यास सुरुवात करतात. परंतु वासरांचा मृत्यु ही दुग्ध व्यवसायातील गंभीर समस्या आहे. नवजात वासरांचे संगोपन करतांना खालील बाबींची प्रामुख्याने अमलबजावणी करावी.

१) जन्मास आल्यावर वासराच्या तोंडावर व शरीरावर चिकट, बुळबुळीत असा स्त्राव आणि आवरण चिकटलेले असते. म्हणुन प्रथम ती आवरणे हाताने किंवा स्वच्छ कोरड्या कपड्याने काढुन टाकावीत. यामुळे रक्ताभिसरण चांगले होऊन वासराच्या अंगी तरतरी येते व श्वासोच्छवास सुरळीत होतो नंतर वासरास त्याच्या आईपुढे ठेवावे म्हणजे ती त्यास चाटून-पुसून स्वच्छ करते.



नवजात वासरू

२) वासरु जन्मल्यानंतर वासराच्या नाळेला पोटापासून २-३ इंच अंतरावर दोऱ्याची घट्ट गाठ मारावी व त्या खालील नाळेचा भाग कात्री किंवा ब्लेड ने कापून घ्यावा. कापलेल्या ठिकाणी 'टिंक्चर आयोडीनम मध्ये बुडविलेला कापसाचा

बोळा फिरवावा. यामुळे नाळेच्या जखमेतुन बाहेरील जंतु वासराच्या शरीरात शिरकाव करू शकणार नाहीत. अशाप्रकारे नाळेची काळजी घेतल्यास वासरातील नाळसुज आजार टाळता येईल.

३) जन्मल्यानंतर पहिल्या अर्ध्या तासातच वासराला चिक पिऊ द्यावा. चीक दुधामध्ये मोठ्या प्रमाणात गाईच्या रक्तातील रोग प्रतिकारक घटक असतात सोबतच प्रथीने, स्निग्ध घटक, खनीज क्षार व जिवनसत्वे भरपुर प्रमाणात असतात. या घटकाच्या सेवनाने वासराच्या वाढीस चालना मिळते, वासराचे पोट साफ राहते. चिक दुधातील रोग प्रतिकारक घटकांचे शोषण आतड्याद्वारे विल्यानंतर पहिल्या दोन तासाच्या कालावधीत सर्वात जास्त असते. त्यानंतरच्या कालावधीत रोग प्रतिकारक घटकांचे पचन होते म्हणुन चिक दुध जन्मल्यानंतर वासराला लवकरात लवकर पाजावे. साधारणपणे वजनाच्या दहा टक्के इतका चिक वासराला दिवसातुन दोन वेळा पाजावा.

बहुसंख्य पशुपालक वार पडल्यानंतर चिक काढतात किंवा चिक वासरांना पाजतात. वार पडण्यास साधारणपणे सहा ते आठ तास लागतात. यामुळे वार पडण्याचा व चिक दुध काढण्याचा संबंध लावु नये. वास्तवीक चिक दुध लवकर काढल्यास वार पडण्याच्या प्रक्रीयेस गती मिळते.

४) वासरे बांधावयाचा गोठा वेगळा हवेशीर, प्रकाशमय असावा. कोंदट किंवा ओलसर जागी वासरे बांधल्यास त्यांना 'न्युमोनिया' होण्याची शक्यता असते. गोठा शक्यतो आईच्या गोठ्याजवळ असावा. वासरे जास्त असल्यास वयोगटप्रमाणे त्यांना वेगळे ठेवावे म्हणजे व्यवस्थापन करणे सोपे जाते. वासरांच्या शरीरावर गोचीड किंवा पिसवांचा प्रादुर्भाव होणार नाही याची काळजी घ्यावी. वासरांना पशुवैद्यकाच्या सल्ल्याने वेळेवर लसीकरण करून घ्यावे. तसेच परोपजीवी कृमी मुळे होणाऱ्या रोगाचा प्रतिबंध करण्यासाठी वासरांना नियमीत पणे कृमीनाशक औषध द्यावे.

वासरांना व्यायामासाठी रोज सकाळी दुध पाजण्याआधी एकदा आणि संध्याकाळी एकदा धावण्यास सोडुन द्यावे. व्यायामामुळे वासरे आनंदी राहुन त्यांची पचनक्रिया व इतर शरीर क्रिया व्यवस्थीत राहुन आरोग्य व वाढ योग्य प्रकारे होते.